उपरोक्त संदर्भाकीत विषयान्वये, सपोनि-राहुल शेजव हे पोलीस स्टेशन अवधुतवाडी येथे कार्यरत असतांना त्यांनी कर्तव्यात केलेल्या कसुरीचे अनुषंगाने त्यांना या कार्यालयाचे क्र.पोअय/कक्ष-१२(२)/अं.आ./सपोनि-शेजव/८९१८/२०२२, दि.२३/०८/२०२२ अन्वये **"पुढिल देय वार्षिक वेतनवाढ दोन (०२) वर्षाकरीता (अपरिणामकारक) रोखणे"** हया शिक्षेचा अंतीम आदेश पारीत करण्यात आला. सदर शिक्षेविरुध्द नमुद अधिकारी यांनी मा. विशेष पोलीस महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र, अमरावती यांना केलेल्या अपील अर्जाचे अनुषंगाने अर्जामध्ये त्यांनी मांडलेले मुद्दे नैसर्गिक न्यायदृष्टीकोनातुन संयुक्तीक व समाधानकार वाटल्याने त्यांना देण्यात आलेल्या शिक्षेत बदल करुन **" सक्त ताकिद"** या देण्यात आलेल्या शिक्षेचा अपील आदेश नमुद संदर्भान्वये कार्यालयास प्राप्त झाला आहे.

तरी उपरोक्त प्रकरणी प्राप्त अपील आदेशाची मुळ प्रत सपोनि-राहुल शेजव नेमणुक पो.स्टे. अवधुतवाडी यांना अदा करुन दुय्यम प्रतिवर त्यांची दिनांकीत स्वाक्षरी घेवुन दुय्यम प्रत विनाविलंब या कार्यालयास सादर करावी.

सहपत्र :- अपील आदेश

(डॉ.पवन बन्सोड)
पोलीस अधीक्षक, यवतमाळ

प्रति,

उपविभागीय पोलीस अधिकारी यवतमाळ,उपविभाग यवतमाळ

प्रत,

अधिकारी आस्थापना लिपीक/राजपत्र लिपीक/वेतन लिपीक अधिकारी यांना माहीती व आवश्यक कार्यवाहीस

कार्यालयः- पोलीस विशेष महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र, अमरावती.
माल टेकडी रोड, कॅम्प एरिया, अमरावती-४४४ ६०६ (महाराष्ट्र)
दुरध्वनी व फॅक्स क्र.०७२१-२६६३२२६, ई-मेल क्र.ig.amravatirange@mahapolice.gov.in/
www.igpamravatirange.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

क्रमांक: अप/कक्ष-५/यवतमाळ/अपिल आदेश/सपोनि-शेजव/ 3266 /२०२३ अमरावती,दि. 31 AUG 2023

वाचा :- १) सपोनि-राहुल शेजव पोलीस स्टेशन अवधुतवाडी जिल्हा यवतमाळ यांच्या विरुध्द संक्षिप्त चौकशीचे कागदपत्रे.

२) पोलीस अधीक्षक, यवतमाळ यांचे आदेश क्र. पोअय/विचौ/कक्ष-१२(२) अं.आ./सपोनि-शेजव ८९१८/२०२२, दि.२३.०८.२०२२

३) सपोनि-राहुल शेजव यांचा दिनांक २०.१०.२०२२ रोजीचा अपील अर्ज

-: अपील आदेश :-

अपिलार्थी सपोनि-राहुल शेजव पोलीस स्टेशन अवधुतवाडी जिल्हा यवतमाळ येथे नेमणुकीस असतांना त्यांनी केलेल्या खालील नमुद कसुरी बद्दल पोलीस अधीक्षक, यवतमाळ यांनी संक्षिप्त चौकशी करुन संदर्भ क्रमांक ०२ अन्वये " **पुढील देय वार्षिक वेतननवाढ दोन (०२) वर्ष (अपरिणामकारक) रोखणे** " ही शिक्षा दिलेली आहे.

कसुरी :-

सपोनि-राहूल शेजव पो.स्टे. अवधुतवाडी येथे कार्यरत असतांना त्यांनी खालील प्रमाणे कर्तव्यात कसुरी केली आहे.

तुम्ही सपोनि-राहूल शेजव पो.स्टे. अवधुतवाडी येथे कार्यरत आहात पोस्टे प्रदिर्घ कालावधीपासुन तपासावरील प्रलंबित असलेले गुन्हे निकाली काढणेबाबत वरीष्ठ कार्यालयाकडून सातत्याने पाठपुरावा करण्यात येत आहे. वरीष्टांनी दिलेल्या आदेशाप्रामणे प्रलंबित गुन्हयाचा आढावा घेतला असता तुमच्याकडे पो.स्टे अवधुतवाडी येथे तपासावर खालील नमुद गुन्हे पोस्टे ला तपासावर प्रलंबित ठेवल्याचे निदर्शनास आले आहे.

१ वर्षावरील भाग ०१ ते ०५

अ.क्र	अप.क्र.	कलम	दाखल तारीख	प्रलंबित कारण
१	६१२/२०१९	४२०,४०६ भादवि	२१.०५.२०१९	पुणे मुंबई येथे तपास बाकी
२	१३७६/२०१९	२३७९,३०४ अ	२८.११.२०१९	आरोपी अटक बाकी
३	२४/२०२०	३०६,३४	११.०१.२०२०	तपासावर
४	१०२/२०२०	क ४०७ भादंवि	०८.०२.२०२०	मुददेमाल जप्त करणे बाकी
५	३४१/२०२०	१५३अ भादंवि	०३.०४.२०२०	दोषारोप बाकी
६	११८९/२०१९	३६८, ३६३, ३५४, भादंविसह पोक्सो	१९.०९.२०१९	आरोपी अटक बाकी

१ वर्षावरील भाग ६ इतर

अ.क्र	अप.क्र.	कलम	दाखल तारीख	प्रलंबित कारण
७	१४४०/२०१९	८(सी),२७ एनडीपीएस	१०.१२.२०१९	पडताळणी बाकी
८	१४८९/२०१९	८(सी),२७ एनडीपीएस	१९.१२.२०१९	पडताळणी बाकी
९	२८१/२०१९	क. ६५ इ मदाका	२७.०२.२०२०	हायकोर्ट स्टे

१ वर्षावरील अकस्मात मयते

अ.क्र	अप.क्र.	कलम	दाखल तारीख	प्रलंबित कारण
१०	२८/२०१९	क. १७४ जाफौ	१८.०४.२०१९	हेड इंजुरी विथ बर्न असल्याने वरिष्ठांशी चर्चा बाकी

६ माह वरील भाग ०१ ते ०५

अ.क्र	अप.क्र.	कलम	दाखल तारीख	प्रलंबित कारण
११	४९३/२०२०	३९३,३४ भादवि	१६.०७.२०२०	आरोपी अटक बाकी
१२	५१६/२०२०	३२६,३२३,३४ भादवि	२४.०७.२०२०	दोषारोप बाकी
१३	५८९/२०२०	क. ४५७,३८० भादंवि	०२.०९.२०२०	मुददेमाल जप्त करणेबाकी
१४	६८१/२०२०	क ४९८ अ, ३२३, ५०४, ५०६ भादंवि	२४.१०.२०२०	पुरावे हस्तगत करणे बाकी

सपोनि-राहुल शेजव नेमणुक पो.स्टे. अवधुतवाडी तुम्ही वरील प्रमाणे १ वर्षावरील भाग १ ते ५ चे ०६ गुन्हे १ वर्षावरील भाग ६ इतर ०३ गुन्हे, १ वर्षावरील अकस्मात मयत १ प्रकरण, व सहा माह वरील भाग ०१ ते ०५ चे ०४ गुन्हे, असो एकुण १४ प्रकरणे प्रदिर्घ काळापासुन तपासावर प्रलंबित ठेवले आहेत.

प्रत्येक मासिक गुन्हे सभेत वेळोवेळी प्रलंबित गुन्हे निकाली काढणेबाबत सुचना देवुनही तुम्ही तुमच्याकडे तपासावर असलेले वरील गुन्हे प्रलंबित ठेवल्याचे निदर्शनास येत आहे. नमुद प्रकरणी तुम्ही नेमलेल्या महत्त्वाचे कर्तव्याकडे दुर्लक्ष केल्याचे व कर्तव्यात बेजबाबदारपणा केला असल्याचे दिसुन येत आहे.

उपरोक्त कसुरी करीता पोलीस अधीक्षक, यवतमाळ यांनी सपोनि-राहुल शेजव पोलीस स्टेशन अवधुतवाडी जिल्हा यवतमाळ यांचेविरुध्द संक्षिप्त चौकशी करुन चौकशीअंती त्यांना कसुरी सिध्द झाल्याने " **पुढील देय वार्षिक वेतननवाढ दोन (०२) वर्ष (अपरिणामकारक) रोखणे** " हि शिक्षा दिली आहे. सदर शिक्षेविरुद अपिलार्थी यांनी या कार्यालयास उद्देशुन संदर्भ क्र.३ प्रमाणे अपिल अर्ज केला आहे.

अपिलार्थी सपोनि-राहुल शेजव पोलीस स्टेशन अवधुतवाडी जिल्हा यवतमाळ यांनी केलेला अपिल अर्ज मुदतीत असल्याने तो विचारात घेण्यात आला असुन अपिल आदेश निर्गमित करण्यापुर्वी अपिलार्थी यांना त्यांची बाजु माडण्या करिता समक्ष मुलाखतीची संधी देण्यात देण्यात आली अपीलार्थी यांनी आज ाकित कक्षात उपस्थित राहुन आमचे समक्ष केलेले कथन व अपील अर्जात उपस्थित केलेले मुददे व त्यावर पोलीस अधिक्षक यांनी सादर केलेली निराकरण टिपणी व अपिलार्थीचे सेवातपशिल या सर्व बाजुचा सारासार विचार करुन त्यांनी मांडलेले मुद्दे नैसर्गिक न्याय दृष्टीकोनातुन आम्हास संयुक्तीक व समाधानकारक वाटत असुन अपिलार्थी यांना पोलीस अधीक्षक यांनी दिलेली शिक्षा हि कसुरीच्या तुलनेत जास्त वाटत असल्याने **मी जयंत नाईकनवरे, विशेष पोलीस महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र अमरावती** अपीलार्थीस दिलेल्या शिक्षेमध्ये बदल करुन खालीलप्रमाणे सुधारीत आदेश देत आहे.

-: आदेश :-

सपोनि-राहुल शेजव पोलीस स्टेशन अवधुतवाडी जिल्हा यवतमाळ यांना पोलीस अधीक्षक, यांनी आदेश क्र.पोअय/विचौ/कक्ष-१२(२)/अं.आ./सपोनि-शेजव/८९१८/२०२२, दि.२३.०८.२०२२ अन्वये " **पुढील देय वार्षिक वेतननवाढ दोन (०२) वर्ष (अपरिणामकारक) रोखणे** " या शिक्षेत बदल करुन " **सक्त ताकिद** " ही शिक्षा देण्यात येत आहे. तसेच भविष्यात त्यांच्याकडुन वरील कसुरीची पुनरावृत्ती होणार नाही. याची त्यांनी दक्षात घ्यावी.

सदर शिक्षेविरुध्द फेर अपिल अनुज्ञेय नाही.

30.8.22

(जयंत नाईकनवरे)
विशेष पोलीस महानिरीक्षक,
अमरावती परिक्षेत्र, अमरावती

प्रति,

सपोनि-राहुल शेजव पोलीस स्टेशन अवधुतवाडी जिल्हा यवतमाळ

प्रत व मार्फत :- पोलीस अधीक्षक, यवतमाळ

२/- कृपया वर नमुद आदेशाची प्रत अपिलार्थीस यांना अदा करुन दुय्यम प्रतीवर त्यांची दिनांकीत स्वाक्षरी घेवुन ती प्रत या कार्यालयास सादर करावी.

३/- अपीलार्थी यांचे संक्षिप्त चौकशी विरुध्दचे कार्यवाहीचे मुळ कागदपत्रे यासोबत जोडुन परत पाठविण्यात येत आहे ते मिळाल्याची पोच दयावी.

क्र.पोअय/कक्ष-१२(२)/अ.आ.ता./पोहवा-१६९१ वाटमोडे/ 3694 /२०२३
कार्यालय पोलीस अधीक्षक, यवतमाळ.
एल. आय. सी. चौक, ता. व जि. यवतमाळ.
पिन कोड: ४४५ ००१.
Email- sp.yavatmal@mahapolice.gov.in
दिनांक :
18 SEP 2023

संदर्भ :- मा.विशेष पोलीस महानिरीक्षक, अमरावती परीक्षेत्र,अमरावती यांचेकडील अपील आदेश क्र. अप/कक्ष-५/यवतमाळ/अपील/अं.आ./पोहवा-१६९१ वाटमोडे/३२६४/२०२३, दि.३१/०८/२०२३

विषय :- अपील आदेश तामील करणेबाबत

--ooo--

उपरोक्त संदर्भाकीत विषयान्वये, पोहवा-१६९१ गजानन वाटमोडे हे पोलीस स्टेशन अवधुतवाडी येथे कार्यरत असतांना त्यांनी कर्तव्यात केलेल्या कसुरीचे अनुषंगाने त्यांना या कार्यालयाचे क्र.पोअय/कक्ष-१२(२)/अं.आ./ पोउपनि गुन्हे +१/४५६९/२०२२, दि.२७/०४/२०२२ अन्वये **"पुढिल देय वार्षिक वेतनवाढ एक (०१) वर्षाकरीता (अपरिणामकारक) रोखणे"** हया शिक्षेचा अंतीम आदेश पारीत करण्यात आला. सदर शिक्षेविरुध्द नमुद अमलदार यांनी मा. विशेष पोलीस महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र, अमरावती यांना केलेल्या अपील अर्जाचे अनुषंगाने पोहवा-१६९१ गजानन वाटमोडे यांना या कार्यालयाकडुन देण्यात आलेली शिक्षा हि कसुरीचे तुलनेत योग्य असल्याने त्यांना देण्यात आलेली शिक्षेविरुध्द केलेला अपील अर्ज **फेटाळण्यात** येवुन शिक्षा **" कायम"** केल्याबाबतचा अपील आदेश नमुद संदर्भान्वये कार्यालयास प्राप्त झाला आहे.

तरी उपरोक्त प्रकरणी प्राप्त अपील आदेशाची मुळ प्रत पोहवा-१६९१ गजानन वाटमोडे नेमणुक अवधुतवाडी यांना अदा करुन दुय्यम प्रतिवर त्यांची दिनांकीत स्वाक्षरी घेवुन दुय्यम प्रत विनाविलंब या कार्यालयास सादर करावी.

सहपत्र :- अपील आदेश

(डॉ.पवन बन्सोड)
पोलीस अधीक्षक, यवतमाळ

प्रति,

उपविभागीय पोलीस अधिकारी यवतमाळ,उपविभाग यवतमाळ

प्रत,

कक्ष-९/कक्ष-९(४)/राजपत्र लिपीक/वेतन लिपीक अमलदार यांना माहीती व आवश्यक कार्यवाहीस

कार्यालय : विशेष पोलीस महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र, अमरावती.
माल टेकडी रोड, कॅम्प एरिया, अमरावती -४४४ ६०६ (महाराष्ट्र)
दुरध्वनी व फॅक्स क्र.०७२१-२६६३२२६, ई-मेल क्र.ig.amravatirange@mahapolice.gov.in/
www.igpamravatirange.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

क्रमांक:- अप/कक्ष-५/यवतमाळ/अपिल/अं.आ/पोहवा-१६९१,वाटमोरे/ 3264 /२०२३, अमरावती दि. 31 AUG 2023

वाचा :- १) पोहवा/१६९१, गजानन वाटमोडे नेमणुक पोलीस स्टेशन अवधुतवाडी जि.यवतमाळ यांच्या विरुध्द करण्यात आलेल्या संक्षिप्त चौकशीचे कागदपत्रे.

२) पोलीस अधीक्षक, यवतमाळ यांचे आदेश क्र. पोअय/कक्ष-१२/वि.चौ/अं.आदेश/पोउपनि-गुहे+१/४५६९/२०२२, दि.२७/०४/२०२२

३) पोहवा/१६९१, गजानन वाटमोडे यांचा दि.०८.०६.२०२२ रोजीचा अपील अर्ज.

-: अपील आदेश :-

अपिलार्थी पोहवा/१६९१, गजानन वाटमोडे नेमणुक पोलीस स्टेशन अवधुतवाडी जि.यवतमाळ येथे नेमणुकीस असतांना त्यांनी केलेल्या खालील नमुद कसुरी बद्दल पोलीस अधीक्षक, यवतमाळ यांनी संक्षिप्त चौकशी करुन संदर्भ क्रमांक ०२ अन्वये " **पुढील देय वार्षिक वेतननवाढ एक (०१) वर्ष (अपरिणामकारक) रोखणे**" ही शिक्षा दिलेली आहे.

कसुरी :-

अपिलार्थी पोहवा/१६९१, गजानन वाटमोडे नेमणुक पोलीस स्टेशन अवधुतवाडी जि.यवतमाळ येथे कार्यरत असतांना त्यांनी खालील प्रमाणे कर्तव्यात कसुरी केली आहे.

१.पोउपनि/राहुल गुहे, २) पोहवा/१६९१, गजानन वाटमोरे, सर्व नेमणुक पोस्टे., अवधुतवाडी (डि.बी पथक) तुम्ही पोस्टे., अवधुतवाडी कार्यक्षेत्रामध्ये डिबी पथकामध्ये कार्यरत आहात.

पोलीस अधीक्षक यांचे आदेशान्वये प्रभारी अधिकारी, स्थानिक गुन्हे शाखा, यवतमाळ यांनी पोलीस स्टेशन अवधुतवाडी व पोलीस स्टेशन यवतमाळ शहर हददीत दिनांक १९/०४/२०२१ रोजी वरली मटका जुगाराचे धंदे समुळ नष्ट करण्यासंबंधाने मोहिम राबवुन स्थानिक गुन्हे शाखा सायबर सेल, यवतमाळ येथील ०२ पोलीस निरीक्षक ०२ सहायक पोलीस निरीक्षक ०१ पोलीस उप निरीक्षक व १७ पोलीस अंमलदार यांनी धाडी टाकुन खालील प्रमाणे तुमचे कार्यक्षेत्रात कार्यवाही करुन वरली मटका जुगाराचे खालील प्रमाणे गुन्हे नोंद केले आहे.

अ. क्र.	पो.स्टे.	अप क्र. कलम,दा.ता.वेळ	घटनास्थळ	आरोपीचे नांव व पत्ता	मिळाला माल
०१	अवधुतवाडी	अपराध क्र.३६२/२१ कलम १२ (अ) म.जु.का सहकलम १०९,	शारदा चौक यवतमाळ	नंदलाला छेदीलाल बडोदा वय ४० वर्ष	वरली मटका जुगाराचे आकडे लिहिलेले दोन बुक व दोन कार्बन तुकडा व एक डॉट पेन तसेच

		भादवि सह कलम ३, ४, साथ रोग नियंत्रण अधिनियम		पवारपुरा यवतमाळ	वरली मटका जुगाराचे नगदी ६४००/- रु.
०२	अवधुतवाडी	अपराध क्र.३६४/२१ कलम १२ (अ) म.जु. का सहकलम १०९, १८८, २६९, २७० भादवि सह कलम ३, ४, साथ रोग नियंत्रण अधिनियम	मोठे वडगांव यवतमाळ	संजय शंकरराव नेवारे वय ३२ वर्ष धंदा सटटापटटी घेणे रा. मोठे वडगांव यवतमाळ	१) वरली मटका जुगाराचे आकडे लिहीलेले एक बुक व एक कार्बन तुकडे कि.अ.००.०० रु २) आरोपी संजय शंकरराव नेवारे यांचे अंगझडती वरली मटका जुगाराचे नगदी १९४०/- रु. ३) एक डॉट पेन ००.०० रु.असा एकुण १९४०/- रु.

यवतमाळ शहर / अवधुतवाडी हददीत एकाच वेळी वेगवेगळया ठिकाणी स्थानिक गुन्हे शाखा, यवतमाळ यांना आदेशीत केल्याप्रमाणे त्यांनी रेड कारवाई करुन एकुण १३ आरोपी विरुध्द ०६ गुन्हे नोंद करण्यात आले असुन आरोपीतांकडून नगदी २७,४००/- रु. व तीन मोबाईल किंमत ३६,०००/- असा एकुण ६३,४००/- रुपयाचा मुददेमाल जप्त करण्यात आला आहे. त्यामुध्ये पोस्टै यवतमाळ शहर कार्यक्षेत्रातील मेन लाईन बिटमध्ये वर नमुद केल्याप्रमाणे वरली मटका साहीत्य व जुगाराची नगदी रक्कम मिळुन आले आहे. नमुद कसुरी प्रकरणी नेमलेल्या महत्त्वाचे कर्तव्याकडे तुम्ही दुर्लक्ष केल्याचे व कर्तव्यात बेजबाबदारपणा केला असल्याचे दिसुन येत आहे.

उपरोक्त कसुरी करीता पोलीस अधीक्षक, यवतमाळ यांनी पोहवा/१६९१, गजानन वाटमोडे नेमणुक पोलीस स्टेशन अवधुतवाडी जि.यवतमाळ यांचेविरुध्द संक्षिप्त चौकशी करुन चौकशीअंती त्यांना कसुरी सिध्द झाल्याने " **पुढील देय वार्षिक वेतननवाढ एक (०१) वर्ष (अपरिणामकारक) रोखणे** " हि शिक्षा दिली आहे. सदर शिक्षेविरुद अपिलार्थी यांनी या कार्यालयास उद्देशुन संदर्भ क्र.३ प्रमाणे अपिल अर्ज केला आहे. सदरचा अपिल अर्ज मुदतीत असल्याने तो विचारात घेण्यात आलेला आहे.

अपिलार्थी पोहवा/१६९१, गजानन वाटमोडे नेमणुक पोलीस स्टेशन अवधुतवाडी जि.यवतमाळ यांचेविरुध्दच्या संक्षिप्त चौकशीचे कागदपत्र, त्यांनी अपिल अर्जात उपस्थित केलेले मुदे व त्यावर पोलीस अधिक्षक यवतमाळ यांनी सादर केलेले निराकरण टिपणीचे अवलोकन केले तसेच अपिल आदेश निर्गमित करण्यापुर्वी अपिलार्थी यांना त्यांची बाजु माडण्या करिता समक्ष मुलाखतीची संधी देण्यात देण्यात आली असुन अपीलार्थी यांनी आज्ञाकित कक्षात उपस्थित राहुन आमचे समक्ष कथन केले की, डि.बी.पथकमध्ये काम करीत असल्याने शिक्षा दिली आहे परंतु पो.नि. यांचे दि.१४.०६.२०२१ रोजी आदेशान्वये डि.बी पथकात कार्यरत होतो. रेडच्या दिवशी दि.१९.०४.२०२१ रोजी अपिलार्थी हे डि.बी कार्यरत नव्हते यावर पोलीस अधिक्षक, यवतमाळ यांचा अभिप्राय मागिविण्यात आला प्राप्त अहवालानुसार अपिलार्थी हे

दि.१३.०७.२०२१ च्या आदेशान्वये डी.बी पथकामध्ये कार्यरत असल्याचे पुरावे जोडले त्यावरुन त्यांना अवैध व्यवसाय समुळ नष्ट करण्याबाबत आदेश देण्यात आले होते. सदरची शिक्षा ही डी.बी.पथकातील कसुरीच्या अनुषंगाने देण्यात आलेली आहे. या प्राप्त अहवालास आम्ही सहमत होउन अपिलार्थी यांना पोलीस अधिक्षक यांनी दिलेली शिक्षा ही कसुरीच्या तुलनेत योग्य असुन त्यामध्ये फेरबदल करणे उचित होणार नाही या निष्कर्षाप्रती येत **मी जयंत नाईकनवरे, विशेष पोलीस महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र अमरावती** अपीलार्थीस खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

-:आदेश:-

पोहवा/१६९१, गजानन वाटमोडे नेमणुक पोलीस स्टेशन अवधुतवाडी जि.यवतमाळ यांना पोलीस अधीक्षक, यांनी आदेश क्र. पोअअग्रा/विचौ-३/अं.आ/पोउनि-गुहे+१/४५६९/२०२२, दि.२७/०४/२०२२ अन्वये " **पुढील देय वार्षिक वेतनवाढ पुढील वेतनवाढीवर एक (०१) वर्षाकरीता (अपरिणामकारक) रोखणे** " या शिक्षेविरुध्द केलेला अपील अर्ज **फेटाळण्यात** येत असुन पोलीस अधीक्षक, यवतमाळ यांनी दिलेली शिक्षा **कायम** ठेवण्यात येत आहे.

अपिलार्थी यांची इच्छा असल्यास ते हा आदेश प्राप्त झाल्याचे दिनांकापासुन ६० दिवसाचे आत मा. पोलीस महासंचालक म.रा. मुंबई यांचेकडे फेर अपील अर्ज सादर करु शकतात.

31-8-23

(जयंत नाईकनवरे)
विशेष पोलीस महानिरीक्षक,
अमरावती परिक्षेत्र,अमरावती

प्रति,

पोहवा/१६९१, गजानन वाटमोडे नेमणुक पोलीस स्टेशन अवधुतवाडी जि.यवतमाळ

प्रत व मार्फत:- पोलीस अधीक्षक, यवतमाळ.

२/- कृपया वर नमुद आदेशाची मुळ प्रत पोहवा/१६९१, गजानन वाटमोडे नेमणुक पोलीस स्टेशन अवधुतवाडी जि.यवतमाळ यांना अदा करुन दुय्यम प्रतीवर त्यांची दिनांकीत स्वाक्षरी घेवुन ती प्रत या कार्यालयास सादर करावी.

३/- अपीलार्थी यांचे संक्षिप्त चौकशी विरुध्दचे कार्यवाहीचे मुळ कागदपत्रे यासोबत जोडुन परत पाठविण्यात येत आहे ते मिळाल्याची पोच दयावी.

क्र.पोअय/कक्ष-१२(२)/अ.आ.ता./सफौ-१५२९ क्षिरसागर/ 646 /२०२३
कार्यालय पोलीस अधीक्षक, यवतमाळ.
एल. आय. सी. चौक, ता. व जि. यवतमाळ.
पिन कोड: ४४५ ००१.
Email- sp.yavatmal@mahapolice.gov.in
दिनांक : 18 SEP 2023

संदर्भ :- मा.विशेष पोलीस महानिरीक्षक, अमरावती परीक्षेत्र,अमरावती यांचेकडील अपील आदेश क्र. अप/कक्ष-५/यवतमाळ/अपील/अं.आ./सपोउपनि-१५२९,क्षिरसागर/३२६५/२०२३, दि.३१/०८/२०२३

विषय :- अपील आदेश तामील करणेबाबत

--ooo--

उपरोक्त संदर्भाकीत विषयान्वये, सपोउपनि-१५२९ गजानन क्षिरसागर हे पोलीस स्टेशन यवतमाळ शहर येथे कार्यरत असुन त्यांनी कर्तव्यात केलेल्या कसुरीचे अनुषंगाने त्यांना या कार्यालयाचे क्र.पोअय/कक्ष-१२(२)/अं.आ./ सपोउपनि-१५२९ क्षिरसागर/४५६१/२०२२, दि.२७/०४/२०२२ अन्वये **"पुढिल देय वार्षिक वेतनवाढ तिन (०३) वर्षाकरीता (अपरिणामकारक) रोखणे"** हया शिक्षेचा अंतीम आदेश पारीत करण्यात आला. सदर शिक्षेविरुध्द नमुद अमलदार यांनी मा. विशेष पोलीस महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र, अमरावती यांना केलेल्या अपील अर्जाचे अनुषंगाने सपोउपनि-१५२९ क्षिरसागर यांना या कार्यालयाकडुन देण्यात आलेली शिक्षा हि कसुरीचे तुलनेत योग्य असल्याने त्यांना देण्यात आलेली शिक्षेविरुध्द केलेला अपील अर्ज फेटाळण्यात येवुन शिक्षा **" कायम"** केल्याबाबतचा अपील आदेश नमुद संदर्भान्वये कार्यालयास प्राप्त झाला आहे.

तरी उपरोक्त प्रकरणी प्राप्त अपील आदेशाची मुळ प्रत सपोउपनि-१५२९ गजानन क्षिरसागर नेमणुक पो.स्टे. यवतमाळ शहर यांना अदा करुन दुय्यम प्रतिवर त्यांची दिनांकीत स्वाक्षरी घेवुन दुय्यम प्रत विनाविलंब या कार्यालयास सादर करावी.

सहपत्र :- अपील आदेश

(डॉ.पवन बन्सोड)
पोलीस अधीक्षक, यवतमाळ

प्रति,

उपविभागीय पोलीस अधिकारी,यवतमाळ [redacted]

प्रत,

कक्ष-९/कक्ष-९(४)/राजपत्र लिपीक/वेतन लिपीक अमलदार यांना माहीती व आवश्यक कार्यवाहीस

कार्यालय : विशेष पोलीस महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र, अमरावती.
माल टेकडी रोड, कॅम्प एरिया, अमरावती -४४४ ६०६ (महाराष्ट्र)
दुरध्वनी व फॅक्स क्र.०७२१-२६६३२२६, ई-मेल क्र.ig.amravatirange@mahapolice.gov.in/
www.igpamravatirange.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

क्रमांक:- अप/कक्ष-५/यवतमाळ/अपिल/अं.आ/सपोउपनि-१५२९,क्षिरसागर/ 3265 /२०२३, अमरावती दि. 31 AUG 2023

वाचा :- १) सपोउपनि-१५२९, गजानन क्षिरसागर नेमणुक पोलीस स्टेशन यवतमाळ शहर जि.यवतमाळ यांच्या विरुध्द करण्यात आलेल्या संक्षिप्त चौकशीचे कागदपत्रे.

२) पोलीस अधीक्षक, यवतमाळ यांचे आदेश क्र. पोअय/कक्ष-१२/वि.चौ/अं.आदेश/सपोउपनि-१५२९ क्षिरसागर/४५६१/२०२२, दि.२७/०४/२०२२

३) सपोउपनि-१५२९, गजानन क्षिरसागर यांचा दि.१५.०८.२०२२ रोजीचा अपील अर्ज.

-: अपील आदेश :-

अपिलार्थी सपोउपनि-१५२९, गजानन क्षिरसागर नेमणुक पोलीस स्टेशन यवतमाळ शहर जि.यवतमाळ येथे नेमणुकीस असतांना त्यांनी केलेल्या खालील नमुद कसुरी बद्दल पोलीस अधीक्षक, यवतमाळ यांनी संक्षिप्त चौकशी करुन संदर्भ क्रमांक ०२ अन्वये " **पुढील देय वार्षिक वेतनवाढ तिन (०३) वर्ष (अपरिणामकारक) रोखणे** " ही शिक्षा दिलेली आहे.

कसुरी :-

अपिलार्थी सपोउपनि-१५२९, गजानन क्षिरसागर नेमणुक पोलीस स्टेशन यवतमाळ शहर जि.यवतमाळ येथे कार्यरत असतांना त्यांनी खालील प्रमाणे कर्तव्यात कसुरी केली आहे.

पोलीस अधीक्षक यांचे आदेशान्वये प्रभारी अधिकारी, स्थानिक गुन्हे शाखा, यवतमाळ यांनी पोलीस स्टेशन अवधुतवाडी व पोलीस स्टेशन यवतमाळ शहर हददीत दिनांक १९/०४/२०२१ रोजी वरली मटका जुगाराचे धंदे समुळ नष्ट करण्यासंबंधाने मोहिम राबवुन स्थानिक गुन्हे शाखा सायबर सेल, यवतमाळ येथील ०२ पोलीस निरीक्षक ०२ सहायक पोलीस निरीक्षक ०१ पोलीस उप निरीक्षक व १७ पोलीस अंमलदार यांनी धाडी टाकुन खालील प्रमाणे तुमचे कार्यक्षेत्रात कार्यवाही करुन वरली मटका जुगाराचे खालील प्रमाणे गुन्हे नोंद केले आहे.

अ. क्र.	पो.स्टे.	अप क्र. कलम, दा.ता.वेळ	घटनास्थळ	आरोपीचे नांव व पत्ता	मिळाला माल
०१	यवतमाळ शहर	३३/२१ कलम १२ (अ) म.जु.का सहकलम १०९, १८८, २६९, २७० भादवि सह कलम ३, ४, साथ रोग	व.ना.शारु यवतामळ चे मागील गेट समोर	१.गजानन कृष्णराव मेहरे वय ४३ वर्ष, धंदा सटटापटी घेणे रा.कोल्हेले आऊट यवतमाळ २) अनिल महादेवराव घोडमारे वय ३८ वर्ष अंबीका नगर दारव्हा	१) आरोपी नामे गजानन मेहर यांचे ताब्यात वरली मटका जुगाराचे आकडे लिहीलेले एक बुक व एक कार्बन तुकडा व एक डॉट पेन तसेच वरली मटका जुगराचे नगदी ३८०/- रु. २) आरोपी नामे अनिल घोडमारे यांचे ताब्यात वरली मटका जुगाराचे आकडे लिहीलेले एक बुक व एक कार्बन तुकडा व एक डॉटपेन तसेच वरली मटका जुगाराचे नगदी ६१०/- रु.

		नियंत्रण अधिनियम	यवतमाळ	ह.मु.वानखेडे यांचे घरी वंजारी फैल यवतमाळ ३) शेख युसूफ शेख गुलाम महेमुद वय ५७ वर्ष रा. तारापुरा यवतमाळ ४) गणेश शिवानंद गोलाईत (पाहीजे आरोपी)	३) आरोपी नामे शेख युसुफ शेख गुलाम महेमुद याचे ताब्यात वरली मटका जुगाराचे आकडे हिलीलेले एक बुक व एक कार्बन तुकडा व एक डॉट पेन तसेच वरली मटका जुगाराचे नगदी ८१०/- रु. अस एकुण १८००/- रु.चा. मुददेमाल
०२	यवतमाळ शहर	अपराध क्र. ३३६/कलम १२ (अ) म.जु. का सहकलम १८८,२६९, २७० भादवि सह कलम ३, ४, साथ रोग नियंत्रण अधिनियम	अप्सरा टॉकीज चौक यवतमाळ	गणेश शिवानंद गोलाईत वय ३० वर्ष धंदा सटटापटटी घेणे रा. बोरले नगर यवतमाळ	१) साहीत्य व नगदी ४३००/-रु २) वरली मटका जुगाराचे आकडे मॅसेव्दोरे किंवा व्हॉटसॲपव्दारे घेण्यासाठी वापरलेला एक व्हीवो कंपनीचा ॲन्ड्राइड मोबाईल फोन कि.अ.५०००/- एकुण ९३००/- रु. मुददेमाल
०३	यवतमाळ शहर	अपराध क्र.३३८/कलम १२ (अ) म.जु. का सहकलम १०९, १८८, २६९, २७० भादवि सह कलम ३, ४, साथ रोग नियंत्रण अधिनियम	मीनल हॉटेल मागे सिव्हील लाईन यवतमाळ	१) निखील गोपाल शर्मा वय ३० वर्ष धंदा सटटापटी घेणे रा.सिव्हील लाईन यवतमाळ २) अक्षय कन्हैयासिंग ठाकुर वय २५ वर्ष धंदा सटटापटी घेणे रा.शारदा चौक यवतमाळ ३) मनोज ऊर्फ सोनु रामुजी विश्वकर्मा वय ३५ वर्ष धंदा सटटापटी घेणे रा.सिव्हील लाईन यवतमाळ ४) राजेश नानकिराम पेंडले वय ५८ वर्ष रा.मोहा यवतमाळ	१) आरोपी नामे निखील शर्मा यांचे ताब्यात वरली मटका जुगाराचे आकडे लिहीलेले एक बुक व एक कार्बन तुकडा एक एक डॉटपेन तसेच वरली मटका जुगाराचे नगदी ४९००/- रु. २) आरोपी नामे अक्षय कन्हैयासिंग ठाकुर याचे ताब्यात वरली मटका जुगाराचे आकडे लिहीलेले एक बुक व एक कार्बन तुकडा व एक डॉट पेन तसेच वरली मटका जुगाराचे नगदी १६१०/- रु.एक व्हीवो व्ही-१९ कंपनीचा मोबाईल फोन कि.अं १५,०००/-रु चा असा एकुण १६,६१०/- ३) मनोज उर्फ सोनु रामुजी विश्वकर्मा यांचे ताब्यातील वरली मटका जुगाराचे आकडे लिहीलेले एक बुक व एक कार्बन तुकडा व एक बुक एक कार्बन तुकडा व एक डॉट पेन तसेच वरली मटका जुगाराचे नगदी १०५०/- रु. एक सॅमसंग ए-३० १६,०००/- रु.असा एकुण १७,०५०/- रु.चा माल ४) आरोपी राजेश नानकिराम पेंडले याचे ताब्यात वरली मटका जुगाराचे आकडे लिहीलेले एक बुक व एक कार्बन तुकडा व एक डॉट पेन तसेच वरली मटका जुगाराचे नगदी ३१००/- रु. असा एकुण४१,६६०/- रु.चा माल.
०४	यवतमाळ शहर	अपराध क्र ३३९/२१ कलम १२ (अ) मुजुका सह कलम १०९,१८८,२६९, २७० भादवि सह कलम ३,४, साथ रोग नियंत्रण अधिनियम	आंबेडकर नगर फोटो जवळ यवतमाळ	विनोद यशंवत तामगाडगे वय ४७ वर्ष रा.आंबेडकर नगर यवतमाळ +१	वरली मटका जुगाराचे आकडे लिहीलेले दोन बुक व दोन कार्बन तुकडा व एक डॉट पेन तसेच वरली मटका जुगाराचे नगदी २३००/- रु.

यवतमाळ शहर / अवधुतवाडी हददीत एकाच वेळी वेगवेगळया ठिकाणी स्थानिक गुन्हे शाखा, यवतमाळ यांना आदेशीत केल्याप्रमाणे त्यांनी रेड कारवाई करुन एकुण १३ आरोपी विरुध्द ०६ गुन्हे नोंद करण्यात आले असुन आरोपीतांकडून नगदी २७,४००/- रु. व तीन मोबाईल किंमत ३६,०००/- असा एकुण ६३,४००/- रुपयाचा मुददेमाल जप्त करण्यात आला आहे. त्यामुध्ये पोस्टै यवतमाळ शहर कार्यक्षेत्रातील मेन लाईन बिटमध्ये वर नमुद केल्याप्रमाणे वरली मटका साहीत्य व जुगाराची नगदी रक्कम मिळुन आले आहे. नमुद कसुरी प्रकरणी नेमलेल्या महत्त्वाचे कर्तव्याकडे तुम्ही दुर्लक्ष केल्याचे व कर्तव्यात बेजबाबदारपणा केला असल्याचे दिसुन येत आहे.

उपरोक्त कसुरी करीता पोलीस अधीक्षक, यवतमाळ यांनी सपोउपनि-१५२९, गजानन क्षिरसागर नेमणुक पोलीस स्टेशन यवतमाळ शहर यांचेविरुध्द संक्षिप्त चौकशी करुन चौकशीअंती त्यांना कसुरी सिध्द झाल्याने " **पुढील देय वार्षिक वेतनवाढ तिन (०३) वर्ष (अपरिणामकारक) रोखणे** " हि शिक्षा दिली आहे. सदर शिक्षेविरुद अपिलार्थी यांनी या कार्यालयास उद्देशुन संदर्भ क्र.३ प्रमाणे अपिल अर्ज केला आहे. सदरचा अपिल अर्ज मुदतीत असल्याने तो विचारात घेण्यात आलेला आहे.

अपिलार्थी सपोउपनि-१५२९, गजानन क्षिरसागर नेमणुक पोलीस स्टेशन यवतमाळ शहर जि.यवतमाळ यांचेविरुध्दच्या संक्षिप्त चौकशीचे कागदपत्र, त्यांनी अपिल अर्जात उपस्थित केलेले मुदे व त्यावर पोलीस अधिक्षक यवतमाळ यांनी सादर केलेले निराकरण टिपणीचे अवलोकन केले तसेच अपिल आदेश निर्गमित करण्यापुर्वी अपिलार्थी यांना त्यांची बाजु माडण्या करिता समक्ष मुलाखतीची संधी देण्यात देण्यात आली असुन अपीलार्थी यांनी आज्ञाकित कक्षात उपस्थित राहुन आमचे समक्ष कथन केले की, दि.१९.०४.२०२१ रोजी रेड झाली त्या दिवशी पासुन अपिलार्थी हे पो.नि. यांच्या आदेशानुसार कसुरीच्या बिट भागात कार्यरत नसुन ते डी.बी.मध्ये कार्यरत होते तरी शिक्षा देण्यात आली. यावर पोलीस अधिक्षक, यवतमाळ यांचा अभिप्राय मागविण्यात आला प्राप्त अहवालानुसार अपिलार्थी हे दि.१७.०३.२०२१, च्या आदेशान्वये डी.बी पथकामध्ये कार्यरत असल्याचे पुरावे जोडले त्यावरुन त्यांना अवैध व्यवसाय समुळ नष्ट करण्याबाबत आदेश देण्यात आले होते. सदरची शिक्षा ही डी.बी.पथकातील कसुरीच्या अनुषंगाने देण्यात आलेली आहे. या प्राप्त अहवालास आम्ही सहमत होउन अपिलार्थी यांना पोलीस अधिक्षक यांनी दिलेली शिक्षा ही कसुरीच्या तुलनेत योग्य असुन त्यामध्ये फेरबदल करणे उचित होणार नाही या निष्कर्षाप्रती येत **मी जयंत नाईकनवरे, विशेष पोलीस महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र अमरावती** अपीलार्थीस खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

-:आदेश:-

सपोउपनि-१५२९, गजानन क्षिरसागर नेमणुक पोलीस स्टेशन यवतमाळ शहर जि.यवतमाळ यांना पोलीस अधीक्षक, यांनी आदेश क्र. पोअअग्रा/विचौ-३/अं.आ/सपोउपनि-१५२९, क्षिरसागर/४५६१/२०२२, दि.२७/०४/२०२२ अन्वये " **पुढील देय वार्षिक वेतनवाढ तिन (०३) वर्ष (अपरिणामकारक) रोखणे** " या शिक्षेविरुध्द केलेला अपील अर्ज **फेटाळण्यात** येत असुन पोलीस अधीक्षक, यवतमाळ यांनी दिलेली शिक्षा **कायम** ठेवण्यात येत आहे.

अपिलार्थी यांची इच्छा असल्यास ते हा आदेश प्राप्त झाल्याचे दिनांकापासुन ६० दिवसाचे आत मा. पोलीस महासंचालक म.रा. मुंबई यांचेकडे फेर अपील अर्ज सादर करु शकतात.

31.8.23

(जयंत नाईकनवरे)
विशेष पोलीस महानिरीक्षक,
अमरावती परिक्षेत्र,अमरावती

प्रति,

सपोउपनि-१५२९, गजानन क्षिरसागर नेमणुक पोलीस स्टेशन यवतमाळ शहर जि.यवतमाळ

प्रत व मार्फत :- पोलीस अधीक्षक, यवतमाळ.

२/- कृपया वर नमुद आदेशाची मुळ प्रत सपोउपनि-१५२९, गजानन क्षिरसागर नेमणुक पोलीस स्टेशन यवतमाळ शहर जि.यवतमाळ यांना अदा करुन दुय्यम प्रतीवर त्यांची दिनांकीत स्वाक्षरी घेवुन ती प्रत या कार्यालयास सादर करावी.

३/- अपीलार्थी यांचे संक्षिप्त चौकशी विरुध्दचे कार्यवाहीचे मुळ कागदपत्रे यासोबत जोडुन परत पाठविण्यात येत आहे ते मिळाल्याची पोच दयावी.

26-4-2023

क्रमांक: पोअय/कक्ष-१२/निलंबन मुक्त/वश्रेलि गेडाम/ २०२३
कार्यालय पोलीस अधीक्षक, यवतमाळ.
एल. आय. सी. चौक, ता. व जि. यवतमाळ
पिन कोड :- ४४५ ००१.
Email- sp.yavatmal@mahapolice.gov.in
दिनांक :- 2 2 SEP 2023

निलंबन मुक्त आदेश

संदर्भ :- १) निलंबन आदेश क्र. पोअय/कक्ष-१२/निलंबन/वश्रेलि गेडाम/१०२४९/२०२३, दिनांक १०/०८/२०२३.
२) या कार्यालयाचे आदेश क्र. पोअय/कक्ष-१२/व.श्रे.लि. गेडाम/कसुरी/प्रा.चौ/११३९८/२०२३, दिनांक १४/०८/२०२३.

विषय :- निलंबनातुन मुक्त करुन शासन सेवेत पुन:स्थापीत करणेबाबत..

---ooo---

ज्याअर्थी, कसुरदार व.श्रे.लि. नितीन गेडाम, तत्का.नेमणुक पो.अ. कार्यालय यवतमाळ सध्या पो.मुख्या. यवतमाळ तुम्ही जिल्हयातील पोलीस अंमलदार यांचे वेतन हे दर महिन्याचे १ तारखेला होणे अभिप्रेत असतांना मागील महिन्याचे (माहे ०६/२०२३ पासुन) चे पोलीस अंमलदार याचे वेतन हे दि.१६/०७/२०२३ पर्यतही केले नाही. तसेच २४१ नवप्रविष्ठ पोलीस अंमलदार यांना वेतन अदा करण्याकरीता सेवार्थ प्रणालीमध्ये त्यांचे नावे व इतर माहिती समाविष्ट केली नाही.

ज्याअर्थी, तुम्ही कसुरदार व.श्रे.लि. नितीन गेडाम, तत्का.नेमणुक पो.अ. कार्यालय यवतमाळ सध्या पो.मुख्या. यवतमाळ तुमच्या अत्यंत बेशिस्त, बेजबाबदार, व अक्षम्य गंभीर कर्तव्यच्युतीमुळे पोलीस अधीक्षक कार्यालयातील प्रशासकीय कामकाजावर प्रश्नचिन्ह उपस्थित झालेला आहे. तुमच्या शासकीय कामकाजात दिरंगाई, कर्तव्यातील गंभीर कुचराई व अक्ष्यम्य कर्तव्यच्युतीच्या अनुषंगाने तुमचेविरुध्द शिस्तभंग विषयक विभागीय कार्यवाहीचे अधिन राहुन तुम्हास महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिले) नियम १९७९ चे नियम क्रमांक ४ (१) मधील तरतुदीनुसार त्वरीत प्रभावाने शासकीय सेवेतुन "निलंबीत" करण्यात आले होते.

ज्याअर्थी, कसुरदार व.श्रे.लि. नितीन गेडाम, तत्का.नेमणुक पो.अ. कार्यालय यवतमाळ सध्या पो.मुख्या. यवतमाळ यांचे विरुध्द प्राथमिक चौकशी या कार्यालयाचे आदेश क्र. पोअय/कक्ष-१२/व.श्रे.लि. गेडाम/कसुरी/प्रा.चौ/ ११३९८/२०२३, दिनांक १४/०८/२०२३ अन्वये अपर पोलीस अधीक्षक, यवतमाळ यांचेकडे आदेशीत करण्यात आली असुन अदयाप अहवाल अप्राप्त आहे.

ज्याअर्थी, मा. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुबंई यांचे परिपत्रक क्रमांक पोमसं/११/२२/६/२५२/२०२१, दिनांक १०/०२/२०१६ अन्वये निलंबीत कर्मचा-यांचे पुर्नविलोकनाबाबत नियमितपणे दर ०३ महिन्यांनी आढावा घेणेबाबत निर्देश देण्यात आले आहे. त्याप्रमाणे दिनांक २२/०९/२०२३ रोजी निलंबन पुर्नविलोकन आढावा घेण्यात आला आहे.

ज्याअर्थी, दिनांक २२/०९/२०२३ रोजी निलंबन आढावा बैठकीमध्ये कसुरदार व.श्रे.लि. नितीन गेडाम, तत्का.नेमणुक पो.अ. कार्यालय यवतमाळ सध्या पो.मुख्या. यवतमाळ यांचे विरुध्द चालु असलेल्या शिस्तभंग विषयक विभागीय कार्यवाहीस बाधा न येता त्यांना निलंबनातुन मुक्त करुन शासन सेवेत पुन:स्थापीत करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

ज्याअर्थी, कसुरदार व.श्रे.लि. नितीन गेडाम, तत्का.नेमणुक पो.अ. कार्यालय यवतमाळ सध्या पो.मुख्या. यवतमाळ यांना त्यांचे विरुध्द सुरु असलेल्या प्राथमिक चौकशीच्या अधिन राहुन कार्यवाहीस बाधा न येता त्यांना कर्तव्यावर हजर झाल्याच्या दिनांकापासुन शासन सेवेत पुनःस्थापीत करण्यात येवुन त्यांची नेमणुक **पोलीस अधीक्षक कार्यालय यवतमाळ** येथे करण्यात येत आहे.

कसुरदार व.श्रे.लि. नितीन गेडाम, तत्का.नेमणुक पो.अ. कार्यालय यवतमाळ सध्या पो.मुख्या. यवतमाळ यांनी निलंबनातुन मुक्त करुन शासन सेवेत पुनःस्थापीत करण्याचे आदेश स्विकारुन त्यांच्या नेमणुकीच्या ठिकाणी पोलीस अधीक्षक कार्यालय यवतमाळ येथे तात्काळ हजर राहावे.

(डॉ. पवन बन्सोड)
पोलीस अधीक्षक, यवतमाळ

प्रति,

व.श्रे.लि. नितीन गेडाम,
नेमणुक पोलीस मुख्यालय यवतमाळ.

मार्फत :- राखीव पोलीस निरीक्षक, पोलीस मुख्यालय यवतमाळ.
२/उपरोक्त आदेशाची मुळ प्रत संबधीतास अदा करुन दुय्यम प्रतीवर त्यांची दिनांकासह स्वाक्षरी घेवुन दुय्यम प्रत या कार्यालयास विनाविलंब सादर करण्यात यावी.

प्रत :- कार्यालय अधिक्षक, पो.अ. कार्यालय यवतमाळ.
२/- नमुद वरिष्ठ श्रेणी लिपीक हे पो.अ. कार्यालय यवतमाळ येथे हजर झाल्याबाबतची माहिती तात्काळ या कार्यालयास सादर करावी.

प्रत :- रा.पो.नि.पो.मुख्या.यवतमाळ/प्रमुख लिपीक लेखा शाखा/अधिकारी वेतन लिपीक **(कक्ष-१७)** /लिपीक आस्थापना **(कक्ष-११)**/राजपत्र लिपीक **(कक्ष-१४)** यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीस.

प्रतीलीपी :- अपर पोलीस अधीक्षक, यवतमाळ/पोलीस उप अधीक्षक (मुख्या.) यवतमाळ.

16-2020

टि. नेमणूक, प

क्रमांक:पोअय/कक्ष-११/ सावरे/लिपीक टंकलेखक/नियुक्ती/ 1380/२०२३
पोलीस अधिक्षक कार्यालय यवतमाळ
एल.आय.सी.चौक, ता.व जि.यवतमाळ, पिन कोड : ४४५००१
Email- sp.yavatmal@mahapolice.gov.in
दिनांक :- .०९.२०२३
20 SEP 2023

-: आदेश :-

पोलीस अधीक्षक कार्यालय, यवतमाळ यांचे आस्थापनेवरील अनुकंपा प्रतिक्षासुचीतील खालील नमूद उमेदवार यांना (प्रतिक्षासुचीतील जेष्ठता क्रमांकानुसार) **"लिपीक-टंकलेखक "** संवर्गातील रिक्त पदावर खालील नमूद अटी व शर्तीच्या अधिन राहून त्यांची **"लिपीक-टंकलेखक "** या पदी अनुकंपा तत्वावर पोलीस अधीक्षक कार्यालय, यवतमाळ. या ठिकाणी पदस्थापना करण्यात येत आहे.

अ.क्र.	नाव	जात व प्रवर्ग	नियुक्तीचा प्रवर्ग	नेमणूकीचे ठिकाण
१	श्री.निलय रामराव साबरे, रा.व्दारा रविंद्र लाड, देवी नगर, लोहारा, यवतमाळ	धनगर (भ.ज.क.)	अनुकंपा (खुला)	पोलीस अधीक्षक कार्यालय, यवतमाळ.

महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार अ ३० जानेवारी २०१९ अन्वये Pay Matrix S-६ रु.१९९०० - रु.६३२००/- मध्ये Leval-६ नुसार रुपये १९९००/- वेतन देय राहील.

लिपीक-टंकलेखक या पदावरील नियुक्ती ही खालील अटी व शर्तीच्या अधीन राहुन करण्यात येत आहे :-

१. आपली नियुक्ती अस्थाई आस्थापनेवर पुर्णतः तात्पुरत्या स्वरुपाची असून आपण सादर केलेल्या कागदपत्रांचे आधारे निवड करण्यात आली आहे. सदर कागदपत्र बनावट/खोट असल्याचे आढळून आल्यास आपली शासन सेवा पुर्व सुचना न देता किंवा कोणतेही कारण न दर्शविता समाप्त करण्याचे नियुक्ती अधिका-याचे अधिकारी अबाधित असतील, व त्याबाबत आपली कोणतेही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

२. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.बीसीसी-२०११/ प्र.क्र.१०६४/२०११-१६-ब, दि.११.१२.२०११ अन्वये मागासवर्गीय उमेदवारांनी जात प्रमाणपत्राची वैधता नेमणूक आदेशापासून ६ महिन्याचे आत सादर करणे आवश्यक राहील. ते दिलेल्या मुदतीत सादर न केल्यास किंवा जात प्रमाणपत्र अवैध ठरल्यास कोणतेही कारण न दाखविता सेवेतून कमी करण्यात येईल. जात प्रमाणपत्र पडताळणी करीता लागणारे मुळ कागदपत्रे ०८ दिवसाचे आत या कार्यालयास सादर करावे. जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त करुन घेण्याकरीता आपण स्वतः प्रयत्नशिल रहावे.

३. आपण नियुक्तीच्या ठिकाणी रुजू होतांना शैक्षणिक पात्रतेची प्रमाणपत्रे, जन्म तारखेच्या पुराव्या संबंधी प्रमाणपत्र, जातीचे प्रमाणपत्र, असल्यास जात वैधता प्रमाणपत्र, अधिवास प्रमाणपत्र व तत्सम शैक्षणिक पात्रतेची मुळ प्रमाणपत्रांच्या छायांकित प्रती साक्षांकित (Attested) करुन कार्यालय प्रमुखाकडे सादर करणे अनिवार्य राहतील.

४. शासन निर्णय गृह विभाग क्र.एमआयएस१०६८/०६७१, रोमण सह, दि.१५.०४.१९७१ अन्वये उमेदवार सेवेत रुजू झाल्यापासून तीन संधीमध्ये सेवाप्रवेशोत्तर (पी.आर.टी.) परिक्षा उत्तोर्ण होणे बंधनकारक राहील. विहीत मुदतीत सेवाप्रवेशोत्तर परिक्षा उत्तीर्ण न केल्यास त्या पुढील वार्षीक वेतनवाढी रोखण्यात येतील.

५. शासन निर्णय वित्त विभाग क्र.अनियो १००५/१२६/सेवा-४, दि.३१.१०.२००५ नुसार दि.०१.११.२००५ रोजी किंवा त्यानंतर शासकीय सेवेत नियुक्ती मिळालेल्या उमेदवारांना परिभाषीत अंशदान निवृत्ती वेतन योजना लागू आहे. मात्र सध्या अस्तित्वात असलेली निवृत्ती वेतन योजना (महाराष्ट्र नागरी सेवा निवृत्ती वेतन)

६. महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटूंबाचे प्रतिज्ञा पत्र) नियम २००५ च्या अंमलबजावणी नुसार उमेदवारांना दि.२८.०३.२००५ रोजी किंवा त्यानंतर हयात असलेल्या अपत्यांची संख्या दोन पेक्षा अधिक नसल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र नमूना-अ (नियम ४) सादर करावे लागेल. हयात अपत्यांची संख्या दोन पेक्षा अधिक आढळून आल्यास नियुक्ती करीता अपात्र ठरविण्यात येईल.

७. उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे (नॉन-क्रिमिलेअर) प्रमाणपत्र लागू असलेल्या जाती प्रवर्गाचे उमेदवारांना नियुक्ती पुर्वी सदर प्रमाणपत्र सादर करणे प्रकरणपरत्वे अनिवार्य राहील.

८. सेवेत रुजू झाल्यानंतर आपणास भारतीय संविधानाप्रती निष्ठा व गोपनीयतेची शपथ घ्यावी लागेल.

९. शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र.एसआरव्ही-१०९२/१०३३/प्र.क्र.३३/९२/८. दि.०२.१२.१९९७ तरतुदीनुसार उमेदवारास शासन सेवेचा राजीनामा दयावयाचा असेल तर एक महिन्याची आगाऊ नोटीस दयावी लागेल. एखाद्या वेळेस अशा प्रकारची सुचना दिली नाही तर आपणांस एक महिन्याचे वेतनाइतकी रक्कम शासन जमा करावी लागेल. आपण सदर रक्कम जमा न केल्यास उक्त रक्कम जमीन महसुल थकबाकी या पध्दतीने वसुल करण्यात येईल.

१०. आपली प्रथम नियुक्ती असल्याने नियुक्तीचे ठिकाणी रुजू होण्याकरीता कोणत्याही प्रकारचा प्रवास भत्ता अनुज्ञेय राहणार नाही.

११. उमेदवाराने त्यांना नेमून दिलेल्या ठिकाणी तात्काळ रुजू व्हावे व मुळ कागदपत्र सादर करावीत. रुजू झालेल्या उमेदवारास त्यांचे नियुक्तीच्या ठिकाणी वास्तव्य करणे अनिवार्य राहील. पुर्व परवानगी शिवाय मुख्यालय सोडता येणार नाही.

१२. उमेदवारांना नियमाप्रमाणे विहीत मराठी व हिंदी भाषा परिक्षा उत्तीर्ण व्हावे लागेल.

१३. सदर आदेश मिळाल्यापासून ३० दिवसांचे आत उमेदवारास पदस्थापनेच्या ठिकाणी रुजू होणे बंधनकारक राहील अन्यथा त्यांचे नांव वगळण्यात येवून प्रतिक्षा यादीवरील पुढील उमेदवारास नियुक्ती देण्यात येईल. त्यानंतर प्राप्त होणा-या तक्रारीचा विचार करण्यात येणार नाही.

१४. वर नमूद केलेल्या अटी व शर्ती व्यतिरीक्त महाराष्ट्र शासनाच्या अधिपत्याखालील राज्य शासकीय कर्मचा-यांना लागू असलेले अन्य सर्व सेवाविषयक नियम सदर उमेदवारांना लागू होतील.

१५. महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.प्रशिक्षण/२०००/प्र.क्र.६१/२००१/३१ दि.११ मार्च २००३ नुसार ज्या उमेदवारांनी संगणक अर्हता (MS-CIT) प्रमाणपत्र सादर केलेले नाही अशा उमेदवारांना नियुक्तीच्या दिनांकापासून २ वर्षाच्या आत संगणक अर्हता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील. जर संबंधीत उमेदवारांकडून विहीत मुदतीत संगणक अर्हता प्रमाणपत्र सादर झाले नाही तर कोणतीही पुर्वसूचना न देता सेवा संपुष्टात येईल याची नोंद घ्यावी.

१६. शासन रिर्णय सामान्य प्रशासन विभागातील राजपत्र दि.०७.१०.१९९३ मध्ये नमूद केलेल्या नियमानुसार माजी सैनिक उमेदवारांनी नियुक्तीच्या ठिकाणी रुजू झाल्याच्या दिनांकापासून ११ महिन्याच्या आत टंकलेखन शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र परिक्षा मराठी-३० प्रति मिनिट किंवा इंग्रजी-४० शब्द प्रती मिनिट उत्तीर्ण प्रमाणपत्र सादर न केल्यास त्यांची नियुक्ती आपोआप संपुष्टात येईल.

१७. खुल्या प्रवर्गातून निवड झालेल्या उमेदवारास त्यांच्या मुळ जातीच्या प्रवर्गाचा फायदा सेवाजेष्ठता पदोन्नतीकरीता घ्यावयाचा असल्यास सदर उमेदवारास नियुक्तीपासून ६ महिन्याच्या आत मुळ जातीचे वैधता प्रमाणपत्र संबंधीत कार्यालय प्रमुख यांच्याकडे सादर करणे बंधनकारक राहील त्यानंतरच त्यांच्या मुळ जातीची नोंद सेवापुस्तक/जेष्ठता यादीवर घेण्यात येईल.

१८. जन्म तारखेसंदर्भात फेरबदल करावयाचा असल्यास त्याबाबतचा अर्ज नियुक्तीच्या दिनांकापासून पाच वर्षांच्या आत सादर करावा. नियुक्ती नंतर पाच वर्षांच्या कालावधीनंतर केलेला अर्ज विचारात घेतला जाणार नाही.

१९. या नियुक्तीव्दारे शासन सेवेत नियुक्ती झाल्यापासून कमीत कमी पाच वर्षाच्या कालावधीपर्यंत आंतर जिल्हा बदलीसाठी अर्ज करता येणार नाही. तसा अर्ज केल्यास तो विचारात घेतला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

(डॉ.पवन बन्सोड)
पोलीस अधीक्षक, यवतमाळ

प्रति,

श्री.निलय रामराव साबरे, रा.व्दारा रविंद्र लाड, देवी नगर, लोहारा, यवतमाळ

प्रत- अ.पो.अ. पो.उप अधि.(गृह)/कार्यालय अधीक्षक/स्वीय सहाय्यक/लेखापाल/वेतन लिपीक-२ कक्ष-१७/ भ.नि.नि. लिपीक/प्रबंधक वि.चो.लि./गविया लिपीक/पेन्शन लिपीक/डीपीजी लिपीक/रापोनि.मुख्यालय

प्रत माहितीस्तव सविनय सादर-

१. मा.विशेष पोलीस महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र, अमरावती.

२. मा.जिल्हाधिकारी, कार्यालय, यवतमाळ

प्रत सस्नेह- जिल्हा कोषागार अधिकारी, यवतमाळ.

क्रमांक:पोअय/कक्ष-१६नि.वेतन/ 13614 /२०२२
कार्यालय पोलीस अधिक्षक, यवतमाळ
एल.आ.सी.चौक ता. व जि.यवतमाळ.
पिन कोड : ४४५००१
Email- sp.yavatmal@mahapolice.gov.in
दिनांक :१७/१०/२०२२
18 SEP 2023

विषय :– 1) सेवानिवृत्त पोलीस कर्मचारी व लिपीक वर्गीय कर्मचारी यांची माहिती सादर करणेबाबत

—0000—

उपरोक्त विषयान्वये खालील नमुद पोलीस कर्मचारी हे त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या प्रमाणे सेवानिवृत्त झाले आहे.

अ. क	कर्मचा–याचे नांव	हुददा व ब.नं.	सेवा निवृत्ती दिनांक	नेमणुक
1	विनायक वाठोडे	सफौ.1229	मयत दि.०९/०७/२०२३	पो.स्टे.वडगांव ज
2	काशिनाथ किसनराव राठोड	सफौ.1753	दि.३१/०७/२०२३	पो.स्टे.बाभुळगांव
3	विजय नथ्थुजी मानकर	सफौ/१९०९	दि.३१/०७/२०२३	पो.मु. यवतमाळ
4	सुनिल रामदत्त शुक्ला	सफौ.४६२	दि.०७/०८/२०२३ स्वेच्छा सेनि	पो.स्टे लोहारा
5	श्रावण तुळशिराम दाढे	सफौ.१७१५	दि.३१/०८/२०२३	पो.स्टे.दारव्हा
6	होमदेव रामचंद्र उघडे	सफौ.1898	दि.३१/०८/२०२३	पो.स्टे.पाढंरकवडा
7	दुर्गालाल श्रीनाथ टेंभरे	पोउपनि	दि.३०/०९/२०२३	पो स्टे.लाडखेड
8	गणेश सखारामजी हिरुळकर	पोउपनि	दि.३०/०९/२०२३	पो.स्टे.नेर
9	सुनिल कोंडबाराव देशमुख	सफौ/१५९८	दि.३०/०९/२०२३	पो.स्टे.खंडाळा
10	सौ.रेखा लक्ष्मणराव ठवकर	सफौ/१५७३	दि.३१/१०/२०२३	पो.मु.यवतमाळ
11	नवनाथ पांडुरंग पारधी	सफौ/१८७४	दि.३१/१०/२०२३	पो.स्टे.लाडखेड
12	प्रकाश सुखदेवराव बोबडे	सफौ/१७८७	दि.३१/१०/२०२३	पो.मु.यवतमाळ
13	विनोद साहेबराव देशमुख	सफौ/५८०	दि.३१/१०/२०२३	मो.प.वि यवतमाळ
14	सुनिल गणपंतराव हरणखेडे	सफौ/७००	दि.३०/११/२०२३	
15	गजानंन हरीभाऊ सरोदे	सफौ/५७१	दि.३०/११/२०२३	
16	दिपक जेशीराम रुडे	सफौ/२४०	दि.३१/०३/२०२४	पो.स्टे.पुसद ग्रा

वरील सेवानिवृत्त कर्मचारी यांचे विरुध्द 1.विभागीय चौकशी किंवा न्यायालयीन कार्यवाही प्रलंबित आहे काय ? 2) सदर कर्मचारी यांचे कडुन कोणत्याही प्रकारची शासकीय घरबांधणी अग्रीम/ मोटर सायकल/कॉम्पुटर अग्रीम सन अग्रीम वसुली बाकी आहे काय या बाबतची संपुर्ण पडताळणी करुन सादर करणे आपली जबाबदारी राहील माहिती 06 दिवसाचे आत पेन्शन लिपीक, लेखा शाखा, पोलीस अधिक्षक कार्यालय यवतमाळ यांना सादर करावी. सदरची माहिती अप्राप्त झाल्यास होणाऱ्या विलंबास आपण सर्वस्वी जबाबदार रहाल याची नोंद घ्यावी

(सुशिला पवार)
कार्यालय अधिक्षक
पोलीस अधिक्षक,कार्यालय यवतमाळ

प्रति,

विभागीय चौकशी लिपीक /वेतन लिपीक 1 व 2 / घरबांधनी अग्रीम लिपीक / घरभाडे लिपीक/जिपीएफ लिपीक/ पो.अ.कार्यालय यवतमाळ

क्रमांक:पोअय/कक्ष-९(२)/प्रोत्साहन भत्ता/२०२३-२४/२०२
कार्यालय पोलीस अधिक्षक, यवतमाळ
एल.आ.सी.चौक ता. व जि.यवतमाळ.
पिन कोड : ४४५००१
Email- *sp.yavatmal@mahapolice.gov.in*
दिनांक : / / २०२३
18 SEP 2023

आदेश

शासन निर्णय, गृहविभाग पीडब्लुएफ/१२०४/१४३ प्र.क्र-७ दिनांक ०६ नोव्हेबर २००६ चे तरतुदीनुसार यवतमाळ जिल्हा पोलीस दलातील विहीत शारीरीक क्षमताधारक पोलीस कर्मचारी ज्यांचे वय ३० वर्षापेक्षा अधिक आहे **आणि बॉडीमास इंडेक्स वैद्यकीय शास्त्रानुसार विहीत केलेल्या सुत्रानुसार अ.क्र. १ ते ५ मधील पोलीस अमंलदार यांचे वयदि.३०.०३.२०२३ राजी पर्यंत ३० वार्षापेक्षा कमी असल्याने** ते BMI करीता अपात्र ठरत असल्याने त्यांना २०२३-२०२४ या वित्तीयवर्षाचा BMI भत्ता मंजुर करण्यात येणार नाही.

अ.क्र	पोलीसअधि/कर्मचारीनाव/पदनाम/बन	नेमणुक	जन्मतारीख	बि.एम.आय
1	मपोशि. 2441/प्रिती भास्करराव पवार	पो.स्टे. यवतमाळ (श.)	24.06.1993	19.86
2	पोशि. 166/सचिन सुधाकर पिंपळकार	पो. मुख्यालय	14.05.1993	24.79
3	पोशि. 264/मोहन गणपतराव मुगावे	पो. मुख्यालय	27.05.1993	24.31
4	पोशि. 1330/रंजना पांडुरंग मसराम	पो.स्टे. दराटी	01.07.1993	24.69
5	मपोशि 2462 मृगरोहिणी रमेश बोरकर	पो स्टे लोहारा	16/06/1993	22.11

(डॉ.पवन बन्सोड)
पोलीसअधीक्षक,यवतमाळ.

प्रति,
वर नमुद ठाणेदार
प्रत,
डी.पी.जी.लिपीक,आस्थापनाशाखा,पो.अ.कार्यालययवतमाळ.

क्रमांक:पोअय/कक्ष-9(4) /पोहवा-1808 सलामे/ 1357/2023
कार्यालय पोलीस अधिक्षक, यवतमाळ
एल.आ.सी.चौक ता. व जि.यवतमाळ,.पिन कोड : 445001
Email- sp.yavatmal@mahapolice.gov.in
दिनांक : 18 SEP 2023

कार्यालयीन आदेश

पोहवा/1808 संदिप हरिदास सलामे, नेमणुक पो.स्टे. कळंब, यांना दिनांक 23/08/2023 रोजी हृदयविकाराचा झटका आल्याने, त्यांचे दिनांक 23/08/2023 रोजी निधन झाले आहे. पोहवा/1808 संदिप हरिदास सलामे, यांचे नाव यवतमाळ जिल्हा पोलीस दलाचे आस्थापनेवरुन दिनांक 23/08/2023 रोजीचे मध्यान्हानंतर कमी करण्यात येत आहे.

(डॉ.पवन बन्सोड)
पोलीस अधीक्षक, यवतमाळ

प्रति,

ठाणेदार पो.स्टे. कळंब / राखीव पोलीस निरीक्षक पो.मु. यवतमाळ

प्रति लिपी-

पो.नियंत्रण कक्ष यवतमाळ/ रापोनि पो.मु. यवतमाळ/ प्रमुख लिपीक (लेखा शाखा) /प्रमुख लिपीक आस्थापणा शाखा (कक्ष-9)/निवृत्ती वेतन लिपीक कक्ष (16)/कार्यालय अधिक्षक/भ.नि.नि.लिपीक (कक्ष-15)/वेतन लिपीक- (कक्ष-18)/वि.चौ.लिपीक (कक्ष-12) /पोलीस कल्याण लिपीक/डिसीपीएस लिपीक कक्ष-24/ कक्ष-14 डीपीजी लिपीक / यांना आवश्यक कार्यवाहीस्तव.

क्रमांक:पोअय/कक्ष-9(3)वि.पो.आहार अनुदान/ 1381 /2023
कार्यालय पोलीस अधिक्षक, यवतमाळ
एल.आ.सी.चौक ता. व जि.यवतमाळ,.पिन कोड : 445001
Email- sp.yavatmal@mahapolice.gov.in
दिनांक : 18 SEP 2023

कार्यालयीन आदेश

मा.पोमसं/28-अ/4937/महिला पोलीस विशेष अनुदान/33(02/)2018 मुंबई दिनांक 23/02/2018 अन्वये महिला सक्षमीकरणाच्या पार्श्वभूमीवर महिला पोलीस अंमलदार यांना पहिल्या प्रसुतीच्या काळात रु.5000/- इतके ' विशेष पोषण आहार अनुदान' पोलीस कल्याण निधीमधुन देण्याबाबत नमुद आहे.

मपोशि/1297 माला हरीभाऊ वानखेडे, नेमणुक पो.स्टे.लोहारा,यांनी महिला सक्षमीकरणाच्या पार्श्वभुमीवर गर्भावस्थेत रु.5000/- इतके विशेष पोषण आहार अनुदान पोलीस कल्याण निधीमधुन मंजूर होणेबाबत केलेल्या विनंती अर्जान्वये, मपोशि/1297 माला हरीभाऊ वानखेडे, यांना रु.5000/- (रु. पाच हजार फक्त) ईतके विशेष पोषण आहर अनुदान पोलीस कल्याण निधीमधुन मंजूर करण्यात येत आहे.

(मा.पो.अ यांचे मान्यतेने...)

(सुशिला पवार)
कार्यालय अधिक्षक,
पोलीस अधीक्षक कार्यालय,यवतमाळ

प्रति

मपोशि/1297 माला हरीभाऊ वानखेडे, नेमणुक पो.स्टे.लोहारा.

मार्फत :- ठाणेदार पो.स्टे. लोहारा.

प्रत :- (कक्ष-23)रोखपाल / (कक्ष-14)डीपीजी लीपीक यांना आवश्यक कार्यवाहीस

प्रत :- पोलीस कल्याण निधी लिपीक (कक्ष-4)यांना माहितीस

क्रमांक:पोअय/कक्ष-११/औषध निर्माण अधिकारी /हजर/ /२०२
पोलीस अधिक्षक कार्यालय यवतमाळ
एल.आय.सी.चौक, ता.व जि.यवतमाळ, पिन कोड : ४४५००१
Email- sp.yavatmal@ mahapolice.gov.in
दिनांक :- .०९.२०२३
12 SEP 2023

संदर्भ :- १) मा. संचालक आरोग्य सेवा पुणे यांचे आदेश क्र. संआसे संचालक कक्ष-पुणे प्रशासकीय बदली गट-क ७२०५ २०२३ ११६४-२४७१ दि.१३.०६.२०२३

०२) वैद्यकीय अधिक्षक ग्रामिण रुग्णालय दिग्रस जि. यवतमाळ यांचे पत्र क्र.ग्रा.रु.दिग्रस/बकामु/२००५-०९/२०२३ दि.०५.०९.२०२३

०३) श्री. मोहन अनंतराव दुहलवार औषध निर्माण अधिकारी पोलीस रुग्णालय यवतमाळ यांचा दि.१२.०९.२०२३ चा विनंती अर्ज.

विषय :- श्री. मोहन अनंतराव दुहलवार औषध निर्माण अधिकारी यांना हजर करुन घेतलेबाबत.

****

उपरोक्त संदर्भांकित विषयान्वये श्री. मोहन अनंतराव दुहलवार औषध निर्माण अधिकारी. यांची संदर्भांकीत क्र.०१ अन्वये पोलीस रुग्णालय यवतमाळ येथे बदली झाली असल्याने त्यांना उक्त संदर्भ क्र.०२ अन्वये दि.०५.०९.२०२३ म.नं. कार्यमुक्त केलेले आहे. ते आपले आस्थापनेवर दिनांक १२.०९.२०२३ चे म.पूर्वी हजर झालेले असल्याने त्यांना या आस्थापनेवर हजर करुन घेण्यात येत आहे तसेच त्यांची नेमणूक पोलीस रुग्णालय यवतमाळ येथे करण्यात येत आहे.

(डॉ.पवन बन्सोड)
पोलीस अधीक्षक,यवतमाळ

प्रति,
श्री. मोहन अनंतराव दुहलवार औषध निर्माण अधिकारी,

प्रत मार्फत -: वैद्यकीय अधिकारी पोलीस रुग्णालय यवतमाळ

प्रत सविनय सादर-
१) मा.उपसंचालक आरोग्य सेवा, अकोला मंडळ अकोला.

प्रत माहितीस्तव:- पगारपट लिपीक कक्ष-१७ लिपीकवर्गीय अधिकारी पगारपट डिपीजी कक्ष-१४ रापोनि पो.मु.यवतमाळ

क्रमांक:पोअय/कक्ष-११/से.नि./प्रलि.अनिल दवंडे/ 13897 /२०२३
पोलीस अधिक्षक कार्यालय यवतमाळ
एल.आय.सी.चौक, ता.व जि.यवतमाळ, पिन कोड : ४४५००१
Email- sp.yavatmal@mahapolice.gov.in
दिनांक :- 12 .०५.२०२३

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

कार्यालयीन आदेश :-

विषय :- श्री.राजेश वामनराव डोंगरे, सहायक लेखा अधिकारी, नेमणूक पोलीस अधीक्षक कार्यालय यवतमाळ यांना नियत वयोमानाने सेवानिवृत्त करणेबाबत.

****

उपरोक्त विषयान्वये कळविण्यात येते की, श्री.राजेश वामनराव डोंगरे, सहायक लेखा अधिकारी, यांना वयाची ५८ वर्ष दि.३०.०९.२०२३ रोजी पुर्ण होत असल्याने त्यांना रकाना ०४ मध्ये नमूद दिनांकास नियत वयोमानानुसार शासकीय सेवेतून सेवानिवृत्त करण्यात येत आहे.

अ.क्र.	शासकीय कर्मचा-याचे पुर्ण नाव	जन्मतारिख	नियत वयोमानानुसार सेवानिवृत्तीची तारिख
१	श्री.राजेश वामनराव डोंगरे, सहायक लेखा अधिकारी.	दि.२७.०९.१९६५	दि.३०.०९.२०२३

(डॉ.पवन बन्सोड)
पोलीस अधीक्षक, यवतमाळ

प्रति,

श्री.राजेश वामनराव डोंगरे, सहायक लेखा अधिकारी,
नेमणूक पोलीस अधीक्षक, कार्यालय यवतमाळ

मार्फत- कार्यालय अधीक्षक, पो.अ.कार्यालय यवतमाळ

प्रत- अपोअ/पोलीस उप अधीक्षक (गृह)/लघुलेखक/पेन्शन लिपीक/भनिनि लिपीक/वि.चौ.लिपीक/डीपीजी लिपीक/वेतन लिपीक-२/पेन्शन लिपीक/ग.वि.यो.लि./पोलीस कल्याण निधी लिपीक/संगणक कक्ष यांना माहितीस व उचित कार्यवाहीसाठी.

प्रत माहितीस्तव सादर -

१) संचालक, लेखा व कोषागारे,
पत्ता- कस्तुरी इमारत तळ मजला, जे.टाटा मार्ग पेट्रोलियम हाऊस समोर चर्चगेट मुंबई.- ४०० ०२०
२) सहसंचालक, लेखा व कोषागारे, अमरावती विभाग, अमरावती
३) जिल्हा कोषागारे कार्यालय, यवतमाळ.

क्रमांक : पोअय/कक्ष- १३/ बक्षिस / 1382 /२०२३
कार्यालय पोलीस अधिक्षक, यवतमाळ
एल.आ.सी.चौक ता. व जि.यवतमाळ.
पिन कोड : ४४५००१
Email- sp.yavatmal@mahapolice.gov.in
दिनांक : 20 SEP 2023

कार्यालयीन आदेश

विषय :- बक्षीस मंजुरी बाबत.

----------ooo----------

